मराठी व इंग्रजी कॉम्प्युटर टायपिंग
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
✲ क्लासची वैशिष्ट्ये ✲
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कॉम्प्युटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118

# दैनिक दिव्य सार्वमंथन

नवी दिशा, नवी आशा

मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in

श्रीयांश इंटरप्राईजेस
गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.
■ सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस
■ सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरून मिळतील.
पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
संपर्क : ८७९३०९५०५०

। अहिल्यानगर । महाराष्ट्र । । वर्ष १ ले । अंक ०८ वा । बुधवार, २० मे २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MHMAR/26/A3154 । sarvmanthan16@gmail.com ।

## तुकाराम मुंढेंची ‘हॉट’ खात्यात एन्ट्री;
# भ्रष्टाचाराचा ‘गेम ओव्हर’ की पुन्हा ‘ट्रान्सफर’?

- २५ बदल्यांचा ‘रेकॉर्ड’ आणि कडक अधिकारी सिस्टिम सुधारणार की पुन्हा गिळंकृत करणार?
- अन्न-औषध खात्याची धुरा मुंढेकडे; भेसळखोरांवर सर्जिकल स्ट्राईक की राजकीय ‘ब्रेक’?
- भ्रष्टाचाराच्या दलदलीत मुंढे उतरले पण सिस्टिम त्यांना किती दिवस सहन करणार?
- धडाकेबाज मुंढेंचा नवा डाव पांढऱ्या बोक्यांची मुस्कटदाबी की ‘ट्रान्सफर इंडस्ट्री’चा विजय?

**रा**ज्याच्या नोकरशाहीत ‘धडाकेबाज’ म्हणून ओळख असलेले आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. अन्न व औषध प्रशासनासारख्या ‘हॉट’ आणि संवेदनशील खात्याची धुरा त्यांच्या हाती देण्यात आली आहे. पण हा निर्णय खरोखरच भ्रष्टाचाराविरोधातील धाडसी पाऊल आहे, की केवळ सिस्टिमने पुन्हा एकदा ‘कडक’ अधिकाऱ्याला नव्या रणांगणात ढकलले आहे. हा खरा सवाल आहे.



अनिल कोळसे
मो. ९८२२५४४०७२

अन्न व औषध प्रशासन विभाग सध्या आरोपांच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. लाचखोरी, भ्रष्टाचार आणि ‘सेटिंग’च्या चर्चांनी या खात्याची प्रतिमा मलीन झाली आहे. मंत्रालयातच अधिकाऱ्यांना रंगेहात पकडले जाणे ही केवळ घटना नसून, सिस्टिममधील सडलेपणाची साक्ष आहे.

अशा वेळी मुंढेसारख्या अधिकाऱ्याची नियुक्ती म्हणजे सरकारचा ‘क्लीन-अप मिशन’ सुरू झाल्याचा संदेश दिला जातोय. पण प्रश्न असा आहे ‑ हा मिशन खरोखरच पूर्ण होणार का? मुंढे म्हणजे नियमांचे पुस्तक हातात घेऊन काम करणारा अधिकारी. त्यांनी दिव्यांग कल्याण विभागात बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे नोकऱ्या मिळवणाऱ्यांवर कारवाई करून सिस्टिमला जबर धक्का दिला होता. पण त्याच वेळी त्यांची बदली झाली. म्हणजेच, सिस्टिमला धक्का देणाऱ्याला सिस्टिम किती काळ सहन करते, हे पुन्हा स्पष्ट झाले.

आता त्यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान आहे ‑ दूध भेसळ माफिया आणि अन्न भेसळखोरांचा अड्डा.

राज्यात ‘पांढरे सोने’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुधात भेसळ करणारे ‘पांढरे बोकड’ अक्षरशः जनतेच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. केमिकल मिसळून नफा कमावणाऱ्या या माफियांना अनेकदा प्रशासनातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांचेही संरक्षण मिळत असल्याचे आरोप वारंवार समोर आले आहेत.

मुंढेंच्या नियुक्तीमुळे या ‘साखळी’वर गदा येणार, हे नक्की. पण खरी लढाई फक्त भेसळखोरांशी नाही ‑ तर सिस्टिममध्ये घर करून बसलेल्या ‘आतील हातां’शी आहे.

जर मुंढे यांनी या माफियांवर कारवाई सुरू केली, तर त्याचा फटका थेट काही प्रभावशाली लोकांना बसणार, हे उघड आहे. आणि इथेच सुरू होते.

२००५ बॅचचा हा अधिकारी तब्बल २५ वेळा बदलीचा सामना करत आहे. सरासरी एक वर्षही एका ठिकाणी टिकू न देणारी ही ‘ट्रान्सफर इंडस्ट्री’ अखेर कोणाच्या फायद्यासाठी काम करते? एक प्रामाणिक अधिकारी सिस्टिम सुधारण्यासाठी धडपडतो, आणि त्यालाच वारंवार बाजूला केले जाते, हा योगायोग आहे का, की ठरवून खेळला जाणारा डाव? आहे आज मुंढेंसमोर दोनच मार्ग आहेत.

एक, सिस्टिममध्ये बसून तडजोड करणे, किंवा दुसरा, सिस्टिमला थेट भिडून पुन्हा एकदा धक्का देणे!

अन्न व औषध प्रशासन विभागात त्यांची एन्ट्री ही केवळ बदली नाही, तर एक मोठी ‘टेस्ट केस’ आहे. सरकार खरंच भ्रष्टाचाराविरोधात लढणार आहे का, की पुन्हा एकदा एक कडक अधिकारी ‘राजकीय बळी’ ठरणार? राज्यभरातील जनतेची नजर आता मुंढेंच्या कारवाईवर आहे. आणि तितकीच नजर सिस्टिमच्या पुढील चालीवरही असेल हे मात्र निश्चित..

### दूध भेसळ रॅकेटचा ‘ट्रेलर’ की सेटिंग? जामखेड कारवाईवर प्रश्नचिन्ह!



अहिल्यानगर जिल्ह्यातील दूध भेसळ माफियाचे जाळे केवळ गावपातळीपुरते मर्यादित नाही, तर ते थेट सिस्टिमच्या आतपर्यंत पोहोचले असल्याची धक्कादायक चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. जामखेड येथील कारवाईने या रॅकेटचा केवळ ‘ट्रेलर’ दाखवला; पण खरी फिल्म अजून बाकी आहे. पोलीसांच्या जाळ्यात अनेक भेसळखोर अडकले, पण त्याचवेळी काहींना ‘सेटिंग’ करून वाचवण्यात आल्याच्या चर्चांनी संशय अधिकच गडद केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेत मोठ्या आर्थिक उलाढालीच्या कुजबुजीने या कारवाईची विश्वासार्हताच प्रश्नचिन्हाखाली आली आहे. याहून धक्कादायक म्हणजे, स्वतःचे राजकीय गणित साधण्यासाठी काहींनी राहुरीतील एका तडफदार तरुण नेत्यालाच बळीचा बकरा बनवल्याची चर्चा रंगू लागली आहे मग प्रश्न एकच ‑ ही कारवाई खरंच भेसळखोरांविरोधातील लढाई आहे, की पडद्यामागे सुरू असलेला राजकीय ‘सेटलमेंट’चा खेळ?

# अहिल्यानगर विधान परिषद निवडणुकीचा बिगुल

**दिव्य सार्वमंथन**
**अ.नगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेच्या रिक्त जागेसाठी अखेर निवडणुकीचा बिगुल वाजला असून तब्बल साडेतीन वर्षांनंतर ही जागा भरली जाणार आहे. ज्येष्ठ नेते तथा दिवंगत माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर रिक्त राहिलेल्या या जागेच्या निवडणुकीमुळे जिल्ह्याच्या राजकारणाला पुन्हा वेग आला आहे.

या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून राहुरीचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे महायुतीतून भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील हेही प्रमुख दावेदार मानले जात आहेत. त्यामुळे ही निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी प्रतिष्ठेची होण्याची चिन्हे आहेत.

भाजपच्या अंतर्गत पातळीवरील चर्चांमध्ये डॉ. सुजय विखे पाटील यांचे नाव पुढे येत असल्याचे बोलले जात आहे. राहुरी पोट निवडणुकीवेळी त्यांच्या नावाची जोरदार चर्चा झाली होती. आता विधान परिषदेसाठीही विखे समर्थकांकडून मोर्चेबांधणी सुरू असल्याचे सांगितले जात असून भाजप अंतिम क्षणी कोणाला उमेदवारी देते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



### तनपुरे विरुद्ध डॉ. सुजय विखे अशी रंगणार प्रतिष्ठेची लढत?



दरम्यान, या निवडणुकीमुळे महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीतील सदस्यांचे महत्त्व अचानक वाढले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीत हेच सदस्य मतदान करणार असल्याने इच्छुकांकडून त्यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

विशेष बाब म्हणजे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका अद्याप झालेल्या नसल्याने नवे सदस्य अस्तित्वात आलेले नाहीत. परिणामी जिल्हा परिषदेचे ७५ सदस्य आणि पंचायत समित्यांचे १४ सभापती मतदान प्रक्रियेबाहेर राहणार आहेत. अन्यथा मतदारसंख्येत आणखी वाढ झाली असती.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १८ स्थानिक स्वराज्य संस्थांमधील एकूण ५६९ सदस्यांपैकी सध्या ४६१ सदस्य कार्यरत आहेत. त्यात महापालिकेचे ६८ नगरसेवक व ५ स्वीकृत सदस्य, नगरपालिका सदस्य ३१२ आणि नगरपंचायतीचे ७६ सदस्यांचा समावेश आहे. म्हणजेच ८१ टक्क्यांहून अधिक मतदारसंख्या उपलब्ध झाल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

विधान परिषदेवर सलग दोन वेळा प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ नेते अरुणकाका जगताप यांचा कार्यकाळ १ जानेवारी २०२२ रोजी संपला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्याने ही जागा दीर्घकाळ रिक्त राहिली. आता साडेतीन वर्षांनंतर निवडणूक होत असल्याने जिल्ह्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा ढवळून निघण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्राजक्त तनपुरे आणि डॉ. सुजय विखे पाटील या दोन नावांभोवती सध्या चर्चेचे केंद्र असले तरी ऐनवेळी जिल्ह्याशी मूळ नाळ असलेले, मात्र पुणे-मुंबईत राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रभाव निर्माण केलेले एखादे व्यक्तिमत्त्वही रिंगणात उतरू शकते, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

त्यामुळे उमेदवारी अर्जाच्या अंतिम मुदतीपर्यंत या निवडणुकीत नवे राजकीय ट्विस्ट पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## ‘जास्त मुले, जास्त पैसे तिसऱ्याला ३० तर चौथ्याला ४० हजार प्रोत्साहन!

### अधिक अपत्यांसाठी आर्थिक मदतीची घोषणा

**दिव्य सार्वमंथन**
**अमरावती । वृत्तसेवा**

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी राज्यातील घटती जन्मदर रोखण्यासाठी घेतलेला निर्णय सध्या देशभरात चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला आहे. तिसरे मूल झाल्यास ३० हजार रुपये आणि चौथे मूल झाल्यास ४० हजार रुपये देण्याची घोषणा करत त्यांनी थेट लोकसंख्या वाढवण्याचे धोरण स्वीकारले आहे. याआधी दुसऱ्या अपत्यासाठी २५ हजारांची घोषणा करून त्यांनी या दिशेने पहिले पाऊल टाकले होते.



एका सभेत बोलताना नायडू यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, एकाच मुलावर भर देणारी मानसिकता राज्याच्या भविष्यासाठी घातक ठरत आहे. मात्र, त्यांच्या या विधानावर आता तीव्र राजकीय प्रतिक्रिया उमटत असून, लोकसंख्या वाढवणे हा उपाय पान २ वर

## वाल्मीक कराडची प्रकृती खालावली

### ३ दिवसांपासून सलाईनवर

**दिव्य सार्वमंथन**
**बीड । वृत्तसेवा**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी गजाआड असलेल्या वाल्मीक कराडची तुरुंगात प्रकृती ढासळल्याची मोठी माहिती समोर आली आहे. वाल्मीक कराड कारागृहात मागील ३ दिवसांपासून सलाईनवर आहे. त्याला वेळीच योग्य उपचार मिळाले नाही, तर त्याचे यकृत निकामी होण्याची शक्यता आहे, असे सांगितले जात आहे. त्यामुळे त्याला अंबाजोगाई स्थित स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्याच्या हालचाली सुरू केल्या जात आहेत.वाल्मीक कराड सध्या बीड जिल्हा मध्यवर्ती कारागृहात आहे. गत ३ दिवसांपासून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तो सध्या सलाईनवर आहे. प्राथमिक माहितीनुसार, पान २ वर

## खेळायला गेल्याने सावत्र आईचा ७ वर्षीय मुलाच्या डोक्यात उलथनीचा प्रहार!

### राहुरी तालुक्यात संताप, आईविरुद्ध गुन्हा दाखल

**दिव्य सार्वमंथन**
**टाकळीमियाँ । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द येथे सावत्र आईच्या अमानुष वागणुकीचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, केवळ मित्रांसोबत खेळायला गेल्याच्या कारणावरून ७ वर्षीय चिमुकल्याच्या डोक्यावर उलथनीने प्रहार करून त्याला जखमी करण्यात आले. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश गंगाराम पिंपळे (वय ३८, रा. पाथरे खुर्द) यांची पहिली पत्नी निधन पावल्याने त्यांनी चार वर्षांपूर्वी सोनाली हिच्यासोबत दुसरे लग्न केले होते. पहिल्या पत्नीपासून वर्षा व संग्राम (वय ७) ही दोन मुले असून, सोनाली ही त्यांची सावत्र आई आहे. ती वारंवार मुलांना मारहाण करून त्रास देत असल्याची माहिती समोर आली आहे.

दि. १७ मे रोजी सकाळी सुरेश पिंपळे हे कामावर गेले असताना दुपारी सुमारास संग्राम हा गावातील मुलांसोबत नदीकाठी खेळत होता. ही बाब लक्षात येताच सावत्र आई सोनाली हिने संतापाच्या भरात त्याला जबरदस्तीने घरी ओढून आणले आणि मुलांबरोबर खेळायला का गेला? असा जाब विचारत थेट उलथनीने त्याच्या डोक्यावर पान २ वर

### वगळले

प्रिंटिंग मिस्टेक झाली
नाव आमचे वगळले
अवघ्या बाजारभरात
विषय जाती चघळले
कार्यकर्ते भावूक भले
लगे आसवे ओघळले
पटले आम्हांकारण ते
असे कसे हो पाघळले
महामुर्ख तुज बनवले
मिडिया वाले बरळले
वागणे अपमानास्पद
चित्त सर्वांचे खवळले
काहींना मिळो लॉटरी
भाग्यकसे फळफळले
असूया मनात भारावी
अनुज का जळफळले
इतक्यां दिसांची निष्ठा
कितीजणा सांभाळले
आता वेळ आल्यावर
आम्हा कसे भंगाळले
हस्तक्षेप करती तिसरे
वातावरण ते निवळले
किंमत शून्यतम आतां
स्थानकाय तसे कळले
वर्णी कार्यकारणीमध्ये
संकट आत्तातर टळले
लक्षात राहणारं कायम
आम्हां नक्कीचं टाळले
- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# एलसीबी व्हेंटिलेटरवर!

### । एसपींचे अवैध धंद्यांवर कारवाईचे आदेश; पण स्थानिक गुन्हे शाखेतील ‘वादग्रस्त चेहरे’ रडारवर!

**दिव्य सार्वमंथन**
**अ.नगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखाची (एलसीबी) अब्रू सध्या चव्हाट्यावर आली असून, गंभीर आरोपांच्या भोवऱ्यात अडकलेल्या अधिकाऱ्यांमुळे पोलीस विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

या आरोपामुळे स्थानिक गुन्हे शाखा बदनामीच्या उंबरठ्यावर असून कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन काय कारवाई करणार याकडे आणि त्यांची लक्ष लागले आहे.

काल नुकत्याच पार पडलेल्या पोलीस अधीक्षकांच्या क्राईम मीटिंगमध्ये जिल्ह्यातील सर्व अवैध व्यवसाय, गुन्हेगारी अड्डे आणि बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिल्याची माहिती समोर येत आहे.

या आदेशानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अक्षरशः व्हेंटिलेटरवर गेल्याची चर्चा असून, वरिष्ठांच्या दबावाखाली एलसीबीकडून अचानक धडक कारवायांचा सपाटा सुरू करण्यात आला आहे.



यामुळे वसुली करणाऱ्या त्या दादांची चांगलीच गोची झाल्याचे बोलले जात असुन मात्र, इतक्या दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध धंद्यांकडे नेमके दुर्लक्ष कोणी केले? हा सवाल आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात असून, वादग्रस्त ठरलेल्या काही अधिकाऱ्यांची उचल बांगडी पोलीस अधीक्षकांकडून होणार असल्याची जोरदार चर्चा पोलीस वर्तुळात रंगली आहे.

## कबाडींवर गंभीर आरोपांचा भडिमार, पी.आय.ला ‘आशीर्वाद’ कुणाचा?

विशेष म्हणजे, एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या कार्यकाळात अनेक धक्कादायक घटना घडल्याचा आरोप होत आहे. जिल्ह्यात गुन्हेगारी टोळ्या फोफावल्या, अवैध कट्टेधारी सुसाट झाले, ड्रग्ससारख्या गंभीर प्रकरणांत संशयाचे सावट निर्माण झाले; मात्र तरीही त्यांच्यावर कारवाई का होत नाही? असा सवाल आता जनतेतून विचारला जात आहे.

> स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्यावर गंभीर आरोप झाले असून, त्यांची खातेनिहाय चौकशी झाली पाहिजे. अन्यथा आम्ही हायकोर्टात रिट पिटीशन दाखल करू, अशी माहिती तक्रारदार विजय मकासरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

> कबाडी यांना नेमके कोण पाठीशी घालत आहे? त्यांच्या मागे कोणाची ‘अदृश्य शक्ती’ कार्यरत आहे? दक्षिणेतील काही राजकीय नेते यावर मौन का बाळगत आहेत? ड्रग्स प्रकरणात फक्त एका कर्मचाऱ्याचाच सहभाग होता का? स्थानिक गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष का झाले? असे एक ना अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. यातील सहभागी अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे का? अशीही चर्चा जोर धरू लागली आहे. त्यामुळे येत्या काळात एलसीबीमधील अनेक मोठे चेहरे अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीमुळे आधीच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना, आता पोलीस विभागातील अंतर्गत कारभारच संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याने प्रशासनाची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# इंधन दरवाढीचा झटका

देशात पाच राज्यांच्या निवडणुकांचा हंगाम संपल्यानंतर गेल्या पाच दिवसातील दुसरी इंधन दरवाढ काल जाहीर झाली आहे. पहिल्या टप्प्यात पेट्रोलच्या दरात साधारण तीन रुपये आणि आज सुमारे ९० पैसे अशी दरवाढ जाहीर करण्यात आली आहे. डीझेलचे दरही त्याच प्रमाणात वाढले आहेत. सध्या कच्च्या तेलाचे भाव ज्या प्रमाणात आहेत त्या तुलनेत देशातल्या तेल उत्पादक कंपन्यांना दररोज सुमारे एक हजार कोटी रुपयांचा भार सोसावा लागत असल्याचे कारण त्यासाठी दिले गेले आहे.तीन रुपयांच्या दरवाढीनंतर हा तोटा अडीचशे कोटी रुपयांनी कमी झाल्याचा सरकारचा दावा आहे, आता या नव्या दरवाढीमुळे तो आणखी कमी होईल; पण तरीही तोटा कायम राहणार असल्याने या पुढील काळातही इंधन दरवाढीचे संकट कायम राहणार आहे.या सगळ्या घडामोडींमध्ये विरोधी पक्षांकडून एक महत्त्वाचा मुद्दा मांडला जात आहे, तो हा की मधल्या अनेक वर्षांच्या काळात कच्च्या तेलाचे दर बऱ्यापैकी स्वस्त होते, त्यामुळे सरकारला सुमारे ४२ लाख कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.कच्च्या तेलाचे दर कमी झालेले असताना त्याचा लाभ देशातल्या सामान्य जनतेला होऊ न देता सरकारने उत्पादन शुल्कात वाढ केली होती. पण आता मात्र कच्च्या तेलाचे दर वाढल्यानंतर त्याचा भार देशातल्या जनतेवर का टाकला जात आहे, हा साधा सरळ प्रश्न सरकारला विचारला जात आहे. पण सरकार त्यावर कोणतेही उत्तर देत नाही. इंधनाचा जादा वापर टाळा असे आवाहन सरकारकडून केले जात आहे. त्याला प्रतिसाद म्हणून काही मंत्री, मुख्यमंत्री आणि खुद्द पंतप्रधान आपल्या वाहन ताफ्यातील वाहने कमी करताना दिसले. महाराष्ट्रातले मुख्यमंत्री दुचाकीवरून मंत्रालयात गेलेले दिसले तर काहीजणांनी पेट्रोल, डीझेलच्या गाड्या सोडून विजेवर चालणाऱ्या गाड्या सरकारी खर्चानेच विकत घेतल्या. पण हा सगळा दिखाऊपणा आहे. त्यातून मूलभूत समस्या दूर होणार नाही. केवळ इव्हेंट मॅनेजमेंट करून प्रसिद्धीचा लाभ घेण्याचा हा सोस अंतिमतः देशाच्या फार सोयीचा नाही. इंधन दरवाढीमुळे अन्य वस्तूंच्या महागाईवर कॅसकेडींग इफेक्ट होतो हा सर्वसाधारण अनुभव असून तो अनुभवही सामान्य नागरिकांना यायला सुरुवात झाली आहे. आजच मुंबईतील पावाच्या दरात पाच रुपयांनी वाढ झाली. याआधी कमर्शियल गॅस सिलेंडरचे दर वाढवल्यामुळे छोट्या छोट्या हॉटेलातून मिळणाऱ्या खाद्यपदार्थांचे भावही वाढले.त्याचा फटका शेवटी सर्वसामान्य नागरिकांनाच बसला. आता बस, रिक्षा, टॅक्सी यांची भाडेवाढ होईल. मालवाहतुकीच्या खर्चात वाढ होऊन त्यामुळेही पुन्हा जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ होईल. ही भाववाढीची होरपळ दिवसेंदिवस अधिक तीव्र होत जाण्याची शक्यता आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारला देशाचे अर्थकारण चालवणे झेपेनासे झाले आहे. त्यातच सरकारला शहाणपणाचे काही आर्थिक सल्ले देणारा कोणी अर्थतज्ज्ञही केंद्रीय पातळीवर कार्यरत असलेला दिसत नाही. या सगळ्या आर्थिक संकटाच्या काळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन नेमकी काय भूमिका निभावत आहेत हेही कळेनासे झाले आहे. सरकारला पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल संपल्यानंतरच देशातल्या आर्थिक संकटाची कशी जाणीव झाली, त्यादरम्यान देशापुढे कुठलेच संकट नव्हते काय असे प्रश्न सरकारला रोज विचारले जात आहेत. सरकार या सगळ्या स्थितीचे खापर पश्चिम आशियातल्या युद्धावर फोडून मोकळे झाले आहे.त्यातच आता नवीन बातमी अशी आली आहे की, अमेरिकेने मधल्या काळात भारताला रशियाकडून तेल खरेदीची जी सवलत दिली होती ती सवलत आता त्यांनी रद्द केली आहे. त्यामुळे केंद्र सरकार या पुढील आव्हानात्मक स्थितीचा कसा सामना करणार हा मोठा प्रश्न आहे. त्यातच देशातील इंधन साठवणूक क्षमता मोदी सरकारने आपल्या बारा वर्षांच्या काळात किती वाढवली हा प्रश्नही सरकारला विचारला गेला पण त्यावरही उत्तर मिळाले नाही.पश्चिम आशियात युद्धाचे ढग जमू लागताच जगातल्या अन्य देशांनी आपल्या देशातील कच्च्या तेलाचे साठे वाढवले, पण ती दक्षताही भारत सरकारने घेतल्याचे दिसले नाही. प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले तेव्हा देशात जेमतेम उपलब्ध साठवणूक क्षमतेच्या केवळ ६० टक्के इतकेच कच्चे तेल शिल्लक होते असे काही जणांचे म्हणणे आहे.म्हणजेच सरकारने युद्धाची शक्यता लक्षात घेऊन इंधन उपलब्धतेकडे जागरूकतेने लक्ष दिले नाही असा सरकारवर आक्षेप आहे, त्याचेही निराकरण झाले नाही. सरकारने सातत्याने इंधनाची कमतरता नाही एवढेच एक वाक्य लोकांना ऐकवले. पण आजही कमर्शियल गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याबाबत जी माहिती सरकारकडून दिली गेली आहे, त्यानुसार मागणीच्या तुलनेत कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा ७० टक्के इतकाच आहे.मागणी इतका पुरवठा सरकार करू शकत नसेल तर मग इंधनाचा तुटवडा नाही हा दावा सरकार कशाच्या आधारावर करते हा मुख्य प्रश्न आहे. केवळ इंधनच नव्हे तर देशातील परकीय चलनाचा साठाही वेगाने कमी होत असून त्याचा मोठा परिणाम पुन्हा देशाच्या अर्थकारणावर आणि पर्यायाने जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईवरच होणार आहे.

# शिष्यवृत्ती निकालात प्रवरा संस्थेचा दबदबा

## डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी दिली यशाची माहिती

**दिव्य सार्वमंथन**
**लोणी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने घवघवीत यश संपादन केले आहे. संस्थेच्या विविध शाखांमधील इयत्ता पाचवीच्या २४७ तर इयत्ता आठवीच्या २४८ विद्यार्थ्यांनी गुणवत्तेमध्ये स्थान मिळवून निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून दिली जाते. शालेय अभ्यासक्रमाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांमध्ये इतर शैक्षणिक परीक्षा देण्यासाठी प्रवृत्तही केले जाते. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने यासाठी विशेष विभाग कार्यरत केला असून, शिष्यवृत्ती परीक्षेमध्येही विद्यार्थ्यांची गुणवत्ता सिद्ध होण्यासाठी संस्थेच्या वतीने मार्गदर्शन केले जाते.



२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या संस्थेतील इयत्ता पाचवीतील २४७ विद्यार्थ्यांनी गुणवत्तेमध्ये यश संपादन केले आहे. तसेच इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये २४८ विद्यार्थ्यांनी यश मिळवून संस्थेचा शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख अधिक उंचावला असल्याचे डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी सांगितले. या परीक्षेतील यशामध्ये संस्थेचे शिक्षक, पालक यांचेही योगदान मोलाचे ठरले आहे.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता स्पर्धात्मक वातावरणात घडविण्यावर भर देत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, यासाठी विविध स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती मार्गदर्शन, विशेष प्रशिक्षण वर्ग आणि अभ्यास उपक्रम राबविले जात आहेत. या प्रयत्नांमुळे संस्थेतील दहावी आणि बारावीच्या परीक्षेमध्येही चांगले यश संपादन केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून शैक्षणिक उत्साह निर्माण करण्याचा प्रयत्न संस्थेने सातत्याने केल्यामुळेच यंदाच्या वर्षी विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे खूप अभिमानास्पद आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ आदींनी अभिनंदन केले आहे.

> "ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही कमी नसतो; मात्र त्याला योग्य दिशा, मार्गदर्शन आणि संधी देण्याची आवश्यकता असते. हे कार्य प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेमार्फत सातत्याने केले जात आहे. प्रवरेच्या विद्यार्थ्यांनी दहावी-बारावीच्या परीक्षेमध्येही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. शिष्यवृत्ती परीक्षेमध्येही विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश इतर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असेच आहे."
> – ना. राधाकृष्ण विखे पाटील

# भरधाव कारच्या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

## धोकादायक वळणावर टर्न न बसल्याने कार पलटी; दोघे गंभीर जखमी

**दिव्य सार्वमंथन**
**पाथर्डी | प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी ते बोरसेवाडी फाटा दरम्यान हॉटेल शुभमजवळ राज्य मार्गावर भरधाव वेगातील कारचा भीषण अपघात होऊन दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

मंगळवारी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. कालिदास शहादेव बनकर (वय अंदाजे ३०) व बबन किसन खेतमाळीस (वय अंदाजे ७०, दोघेही रा. मिरजगाव, ता. कर्जत) अशी मृतांची नावे आहेत. तर अक्षय निलेश शिरसागर (वय अंदाजे २८) व उमेश मिटकरी (वय अंदाजे ३८, दोघेही रा. मिरजगाव, ता. कर्जत) हे गंभीर जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, टाटा अल्ट्राज कार (क्र. एम एच १४ एल जी ८४१६) ही पाथर्डीहून मिरजगावच्या दिशेने जात होती.



माणिकदौंडी ते बोरसेवाडी फाट्या दरम्यान हॉटेल शुभमजवळील धोकादायक वळणावर चालकाचा वळणावर गाडीचा टर्न न बसल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कार रोडच्या कॉर्नरला जाऊन पलटी झाली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की कारमधील कालिदास बनकर व बबन खेतमाळीस यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींसह सर्वांना पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

मात्र डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. गंभीर जखमी असलेल्या अक्षय शिरसागर व उमेश मिटकरी यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुहास गायकवाड व पोलीस कॉन्स्टेबल धनराज चाळक यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

# मांजरीत दुचाकी चोरणाऱ्याची नागरिकांकडून यथेच्छ धुलाई

**दिव्य सार्वमंथन**
**मांजरी | प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील मांजरी येथे सकाळच्या वेळी एका घरात चोरी करण्याचा प्रयत्न करुन मोटारसायकलवर पळून जात असलेल्या दोन भामट्यांना पकडुन पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आल्याची घटना दि. १८ मे रोजी घडली.

पोपट कारभारी बाचकर, वय ५५ वर्षे, रा. मांजरी, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास पोपट बाचकर यांच्या पत्नी मंगल या त्यांच्या घराचे बाहेर दारात आल्या. तेव्हा एक अनोळखी इसम मोटारसायकलवर रस्त्याच्या कडेला मोटारसायकल उभी करून थांबला होता. त्यावेळी मंगल यांनी त्याला विचारले कि, कोण पाहिजे तुला, इथे काय करतो? असे विचारले. तेव्हा शेजारी राहणारे ज्ञानेश्वर विष्णु हंडाळ याचे घराचे कंपाऊंड मधून एक दुसरा अनोळखी इसम उडी मारून बाहेर आला. व दोघेही मोटारसायकलवर बसले व पाथरे गावच्या दिशेने निघाले. तेव्हा पोपट बाचकर हे घरी गेले असता पत्नीने सदर घडला प्रकार त्यांना सांगितला. त्यावेळी पोपट बाचकर यांनी त्या अनोळखी इसमांचे मोटारसायकलचा पाठलाग केला. त्यांना पाथरे गावात प्रवरा नदी पुलावर पकडले. आणि त्यांना मांजरी गावात घेऊन आले. तेव्हा त्यांची झडती घेतली असता सदर इसमांजवळ लोखंडी टॉमी मिळून आली.

घटनेची माहिती मिळताच पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन त्या इसमांना ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांनी त्यांची नावे आकाश छगन काळे, वय २५ वर्षे, रा. अंतापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर तसेच अमीर दशरथ चव्हाण, वय १९ वर्षे, रा. चितेगाव ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यानंतर पोपट कारभारी बाचकर यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींवर गुन्हा रजि. नं. ५४४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३ (५), ३०३ (२), ६२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# शंकर तमनरवर कोयत्याने वार

**दिव्य सार्वमंथन**
**उंबरे | प्रतिनिधी**

मागील भांडणाच्या कारणावरुन आरोपींनी शंकर तमनर या तरुणाला शिवीगाळ करुन लाकडी दांडा व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच कोयता मारुन जखमी केले.

ही घटना दि. ८ मे रोजी राहुरी तालुक्यातील तमनर आखाडा येथे घडली.

शंकर चिमाजी तमनर, वय २७ वर्षे, हा तरुण राहुरी तालुक्यातील तमनर आखाडा येथे त्यांच्या कुटुंबासह राहतो. त्याच्या शेता शेजारी त्याचा चुलत भाऊ बाळासाहेब भिमाजी तमनर याची शेती असून दोघांमध्ये शेतातील बांधावरुन वाद आहे. सुमारे दोन महिन्यापूर्वी दोघात वाद होवून त्या बाबत शंकर तमनर याने राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

दि. ८ मे २०२६ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास शंकर तमनर हा शेतात जात होता. तेव्हा आरोपी त्यांचे शेतातुन गावात घराकडे येत होते. तेव्हा आरोपींनी त्यांच्यावर कोयत्याने वार केला.

## राहुरीत जागा भाडोत्री देणे आहे

नगर मनमाड रोड हॉटेल आकाश शेजारी जोगेश्वरी आखाडा जवळ पाच गुंठे चे शेड व पडवी व मोकळी जागा भाडोत्री देणे आहे.
संपर्क :- मोबाईल नंबर ९४२२०२१०२६ (११ मार्च)

## मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६ (०३ डिसेंबर)

## राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क-९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४ (०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 18.5.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 18.5.26

| | | | |
|---|---|---|---|
| 1 128 245 489 | 6 259 358 457 | 3 120 247 256 | 8 170 279 567 |
| दिनांक १९.५.२६ | | | |
| 2 237 390 679 | 7 160 269 368 | 4 239 347 356 | 9 180 289 478 |
| दिनांक २०.५.२६ | | | |
| 3 580 670 689 | 8 350 369 459 | 5 140 249 348 | 0 235 370 578 |
| दिनांक २१.५.२६ | | | |
| 4 130 239 347 | 9 126 234 469 | 6 259 358 457 | 1 290 380 470 |
| दिनांक २२.५.२६ | | | |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 138 147 156 |
| दिनांक २३.५.२६ | | | |
| 6 367 349 790 | 1 290 380 470 | 8 125 189 459 | 3 148 346 689 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 18.5.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23
विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

पान १ वरून पान १ वरून

## मुलाच्या डोक्यात उलथनीचा प्रहार!

प्रहार केला. या मारहाणीत संग्रामच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरू झाला. दरम्यान, सुरेश पिंपळे यांना त्यांच्या भावाने, किशोर गंगाराम पिंपळे यांनी फोन करून घटनेची माहिती दिली. घरी आल्यानंतर त्यांनी मुलाची अवस्था पाहून धक्का बसला. मुलाने घडलेला प्रकार सांगितल्यानंतर त्यांनी पत्नीला जाब विचारला असता, सोनाली हिने उलट शिवीगाळ करत मुलाला येथे ठेवू नका, नाहीतर ठार मारेन अशी धमकी दिली. या घटनेनंतर सुरेश पिंपळे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी सोनाली सुरेश पिंपळे हिच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ५४०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ अंतर्गत मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे सावत्र नात्यातील संवेदनशीलतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून. पोलीस पुढील तपास करत आहेत.

## चौथ्याला ४० हजार प्रोत्साहन!

की नव्या संकटाला आमंत्रण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दक्षिण भारतातील काही राज्ये लोकसंख्या वाढवण्याच्या भूमिकेकडे झुकत असताना, देशासमोर आधीच असलेल्या संसाधनांच्या तुटवड्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या तब्बल १६७ कोटींवर पोहोचणार आहे. त्यातच प्रजनन दर सतत घटत असला तरी, एकूण लोकसंख्येचा प्रचंड भार देशाच्या खांद्यावर वाढतच आहे. देशाकडे जगाच्या केवळ २.४% जमीन असताना लोकसंख्या मात्र १८% आहे. यामुळे लोकसंख्या घनता ४८४ प्रति चौ.कि.मी.पर्यंत पोहोचली आहे, तर मुंबईसारख्या शहरांमध्ये ही स्थिती २८ हजारांहून अधिक आहे. अशा परिस्थितीत लोकसंख्या वाढवण्याचे धोरण म्हणजे आगीत तेल ओतण्यासारखे असल्याची टीका होत आहे. अन्न, पाणी आणि निवास या मूलभूत गरजांवर आधीच प्रचंड ताण आहे. देशातील ५८ कोटींहून अधिक लोकांना आजही पुरेसा आहार मिळत नाही, तर १७ कोटी लोक कुपोषणाशी झुंज देत आहेत. पाण्याची उपलब्धता दिवसेंदिवस घटत असून, २०३० पर्यंत अनेक मोठी शहरे 'ड्राय झोन'मध्ये जाण्याचा इशारा दिला गेला आहे. यासोबतच आरोग्य आणि शिक्षण व्यवस्थाही कोलमडण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे. प्रति हजार लोकांमागे रुग्णालयातील बेड्सची संख्या कमी होत चालली आहे, तर हजारो शाळांमध्ये एकच शिक्षक असल्याची गंभीर स्थिती आहे.

## वाल्मीक कराडची प्रकृती खालावली

वाल्मीक कराडला युरोसिस्टायसिसचा संसर्ग झाल्याचा अंदाज आहे. सिस्टायसिस हा मूत्राशयाशी संबंधित आजार आहे. त्यात मूत्रमार्गात संसर्ग होतो. बीड जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने त्याची वैद्यकीय तपासणी केली. पण त्याची प्रकृती सातत्याने ढासळत आहे. वेळीच योग्य उपचार न मिळाल्यास या आजारात रुग्णाचे यकृत निकामी होण्याचा धोका असतो. त्यामुळे वाल्मीक कराडला आता अंबाजोगाई स्थित स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.उल्लेखनीय बाब म्हणजे बीड जिल्हा कारागृहात वाल्मीक कराडच्या गँगची मोठी दहशत असल्याची बातमी काही दिवसांपूर्वी पुढे आली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी तुरुंगात कैद्यांमध्ये बसण्याच्या जागेवरून वाद झाला होता. या वादातून वाल्मीक कराड टोळीतील सुदर्शन घुले, प्रतीक घुले व शंकर शेप यांनी अजहर पठाण नामक दुसऱ्या एका कैद्याला बेदम मारहाण केली होती. यासंबंधी अजहर पठाणची एक ऑडिओ क्लिप माध्यमांत व्हायरल झाली होती. त्यात पठाण सांगतो की, माझ्या हाताला गंभीर इजा झाली आहे. तुरुंग प्रशासन माझे काहीही ऐकत नाही. त्यांनी पैसे घेतले आहेत. मला धमक्या दिल्या जात आहेत.

## थोडक्यात

### देवगड येथे उद्यापासून राधाकृष्ण महाराजांची भागवत कथा

दिव्य सार्वमंथन ✍ नेवासा । त्रैवार्षिक पुरुषोत्तम मासानिमित्त, नेवासा तालुक्यातील श्री गुरुदेव दत्त पीठ क्षेत्र देवगड येथे भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राजस्थान (जोधपूर) येथील प्रसिद्ध गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून गुरुवार, दि. २१ मे पासून येथे श्रीमद भागवत कथा सोहळा सुरू होत आहे. गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वात हा सोहळा होत आहे. कथेसोबतच या निमित्ताने भव्य कीर्तन महोत्सवाचेही आयोजन करण्यात आले असून, देवगडमध्ये सध्या याची जय्यत तयारी सुरू आहे. श्रीमद भागवत कथा दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून कथा श्रवणाचा लाभ भाविकांना घेता येईल.



कथेच्या निमित्ताने श्री दत्त लक्ष्मी नारायण यागचे देवगड येथील यज्ञमंडपात भव्य आयोजन करण्यात आले आहे. दुपारच्या सत्रात ३:३० ते ५ या वेळेत दररोज कीर्तन सेवा होईल. यामध्ये गणेश महाराज तनपुरे (देवगड), शशिकांत महाराज कोरेकर (खलाल पिंपरी), रामनाथ महाराज पवार (बहिरवाडी), लक्ष्मण महाराज नांगरे आणि सुदर्शन महाराज देशमुख (आळंदी) यांची सुश्राव्य कीर्तने होणार आहेत.बुधवार, दि. २७ मे रोजी क्षेत्र देवगड येथे भव्य दिंडी मिरवणूक आणि श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा यांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. गुरुवार, दि. २८ मे रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे काल्याचे कीर्तन होईल. राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या पावन उपस्थितीत या कीर्तनाने श्रीमद भागवत कथा सोहळा आणि कीर्तन महोत्सवाची सांगता होईल. या अभूतपूर्व धार्मिक सोहळ्याचा आणि कीर्तन महोत्सवाचा सर्व भाविकांनी मोठा संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त मंदिर संस्थान देवगड व श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## गोदावरी वसाहत आणि ३४० गट नंबरमधील

# जागा रहिवाश्यांच्या नावावर करणार : डॉ. विखे पाटील

**दिव्य सार्वमंथन**
**राहाता । प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील साकुरी येथील गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचे नाव सात बारा उताऱ्यावर येईल. आपण विधानसभा निवडणुकीच्या वेळी दिलेला शब्द पाळला असल्याचे प्रतिपादन भाजपा चे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

राहाता तालुक्यातील साकुरी येथील गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचे जागेच्या संदर्भात विशेष पाठपुरावा करून तेथील रहिवाश्यांच्या नावावर जागा करण्याबाबत डॉ. विखे पाटील यांनी रहिवाशी व स्थानिक कार्यकर्त्यांची बैठक राहाता बाजार समितीत घेतली. त्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ, मोहन सदाफळ, संजू सदाफळ, डॉ स्वाधीन गाडेकर, नगराध्यक्ष, विजय सदाफळ उपनगराध्यक्ष नगरसेवक कैलास सदाफळ, मुन्ना शहा, राजेंद्र निकाळे, सुधाकर दंडवते, कानीफ बावके, संदिप दंडवते, भारत बनसोडे, सचिन बनसोडे, शिवाजी नजन, सतिश बावके, विकास बावके, हरिश श्रीखडे, रमेश गायकवाड, पप्पू बनसोडे, बबन बनसोडे, अक्षय रोहोम, बाबासाहेब डांगे, रावसाहेब बनसोडे, पुंडलिक बावके, नंदा माळी, चंद्रकांत बनसोडे, बाळू जाधव, सुनील लोखंडे, दीपक शिंदे, दीपक दंडवते, शहा, किशोर दंडवते आदी यावेळी उपस्थित होते.

आपल्या भाषणात डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले, राहाता येथील ३४० आणि साकुरीची गोदावरी वसाहत या जागेबाबत अनेक मोठ्या तंत्रिका अडचणी निर्माण झाल्या होत्या. जागा वनविभागाची आहे आणि अनेक अडचणी येतील अशी काहींनी शंका उपस्थित केली होती. परंतु सुजय विखे पाटलांनी दिलेला शब्द पूर्ण करतात, हा सर्व सामान्य जनतेला विश्वास होता. आणि आपण या बाबत प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून विश्वास सार्थ ठरवला. या जागेच्या बाबतीत सर्वात मोठी अडचण सातबाऱ्यावर सरकार असे नाव लागले होते. गुंतागुंत वाढली होती. परंतु दोन दिवस आधी आपण महाराष्ट्र शासन असे नाव लावून घेतले. त्या मुळे आता कायदेशीररित्या स्थानिक नागरिकांच्या नावावर जागा करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्या मुळे तुमची जागा तुमच्या नावावर फक्त आणि फक्त सुजय विखेच करू शकतो! असे सांगून डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले, अनेक वर्षापासून जागा नावावर करण्याचा



संघर्ष ३४० व गोदावरी वसाहतीतील रहिवाश्यांचे संपला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाने हा प्रश्न सोडविला. विधानसभेच्या निवडणुकीत तुमची जागा तुमच्या नावावर करून देतो हा शब्द आपण पाळला.

सर्वांच्या विश्वासामुळे पालिकेत निर्विवाद सत्ता मिळाली. साकुरीतही आपण ५ कोटींचे कामे करू शकलो. अंतर्गत गटारी, रस्त्यांचे कामे मार्गी लागली. तुम्ही सर्वजण मतभेद विसरून एकत्र आला म्हणून हे शक्य झाले. राहाता शहराला किती निधी दिला. हे मी आत्ता सांगणार नाही.

मतदार संघात धर्म, जात याला थारा देणार नाही. गुन्हेगारीला साथ देऊ नका. आपल्याला मतदार संघातील गुन्हेगारी मोडीत काढायची आहे. मुलींची कुणी छेड काढत असेल तर त्याच्या घरावर बुलडोझर चालविण्यास मागे पुढे पाहणार नाही. असा इशारा डॉ. विखे पाटील यांनी गुन्हेगारांना दिला.

# ‘अंगावर जेसीबी घालून तुला संपवून टाकू!’

## महिला शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी; शेकडो ब्रास मातीची चोरी

**दिव्य सार्वमंथन**
**नेवासा । प्रतिनिधी**

‘तू जर आम्हाला विरोध केला, तर तुझ्या अंगावरून जेसीबी घालून तुला जीवे ठार मारू! आम्ही सर्वांना पैसे देऊन, मॅनेज करूनच हे काम करतो. जगायचं असेल तर आमच्या नादी लागू नको...’ अशा अत्यंत विखारी शब्दांत दमबाजी करत नेवासा खुर्द येथील एका महिला शेतकऱ्याच्या जमिनीतून रात्रीच्या अंधारात शेकडो ब्रास माती उचलल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नेवासा येथील प्रमिला राधाकिसन म्हस्के यांनी थेट तहसीलदारांकडे लेखी तक्रार करून कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात प्रमिला म्हस्के यांनी तक्रारीचा पाढाच वाचला आहे. नेवासे खुर्द येथील उस्थळ दुमाला रस्त्यावरील गट क्रमांक ९३१ मध्ये म्हस्के या आपल्या मुलाबाळांसह राहतात आणि शेती करतात. मात्र, याच शेतातून महसूल नियमांना पूर्णपणे तिलांजली देत राहुल तुकाराम मतकर, अनिकेत तुकाराम मतकर आणि जेसीबी चालक भाऊराव उमाजी मतकर (सर्व रा. नेवासे) यांनी रात्रीच्या सुमारास जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या सहाय्याने तब्बल १५० ते २०० ब्रास माती बेकायदेशीरपणे उकरून नेली.

शेतजमिनीतून अशा प्रकारे व्यावसायिक उत्खनन करण्यास कायद्याने सक्त बंदी आहे. असे असतानाही महसूल विभागाचा कायदा चक्क पायाखाली तुडवून या तस्करांनी उच्छाद मांडला आहे. ‘या अवैध माती उपसा करणारेवर आणि त्यांच्या वाहनांवर तात्काळ समक्ष पाहणी करून पंचनामा करावा व गुन्हे दाखल करावेत; अन्यथा मला लोकशाही मार्गाने आंदोलन छेडावे लागेल’, असा सज्जड इशारा प्रमिला म्हस्के यांनी प्रशासनाला दिला आहे.

आता यावर थेट महसूल प्रशासनाचेच नाव बदनाम



करणाऱ्यावर नेवासा तहसीलदार काय अ‍ॅक्शन घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे


## मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. टाकळीमिया

ता. राहुरी.जि.अहिल्यानगर
मुख्यकार्यालय – टाकळीमिया फोन नं. (०२४२६)– २४७१९६,२९६. (०२४२६)– २३३४९६ (०२४२६)– २७२४९६
जा.क्रं. ९२५१/ मियासाहेब पतसंस्था /२०२६ दिनांक १६/०५/२०२६

### स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस

**नमुना ‘झेड’**
**(नियम १०७ पोट–नियम (११ (ड–१)**

ज्या अर्थी खाली सही करणार वसुली अधिकारी द्वारा मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. टाकळीमिया. ता. राहुरी. जि. अहील्यानगर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये असुन थकबाकी मागणीची नोटीस ऋणको यांना देउन नोटीसीमध्ये नमुद केलेली रक्कम दसर नोटीस मिळालेच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत भरणा करणेबाबत सांगितलेले होते परंतु ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केलेली आहे त्यामुळे खाली सही करणाऱ्याने स्थावर जप्तीची नोटीस दिली असुन पुढे निर्दीष्ट केलेली मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने त्यांचेकडे असलेली थकीत रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणको व सर्व नागरीकांना याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे की, खालील निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड–१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतिकात्मक ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला व नागरीकांना याद्वारे सुचित करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. टाकळीमिया. ता. राहुरी. जि. अहील्यानगर यांच्याकडील बोजाची रक्कम आणि होणारे व्याज, इतर खर्च, आदेशिका खर्चाचे अधिन रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ.नं. | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट नं. भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार–सौ. जयश्री दादासाहेब कोळसे<br>जामीनदार–श्री. धनंजय सुरेश करपे<br>जामीनदार–श्री. दादासाहेब गोरक्षनाथ कोळसे | दावा रक्कम रु.<br>९१९०००/–<br>दि.०१/१०/२०२२ पासून<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०४/२०२३<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०८/२०२३<br>ताबा नोटीस<br>दि.०५/०८/२०२४ | टाकळीमिया<br>टाकळीमिया<br>टाकळीमिया | १२९/१<br>१२९/२<br>१२९/२/१ | ०२ हे.१६ आर<br>०१ हे. २० आर |
| २. | कर्जदार – श्री. भगवान ज्ञानेश्वर मगर<br>जामीनदार–श्री. अनिल चांगदेव रोडे<br>जामीनदार श्री. बाबासाहेब नाना लोंढे | दावा रक्कम रु.<br>३२५५००/–<br>दि.०१/१०/२०२२<br>पासून १५% व्याज+<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२०/०३/२०२३<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०८/२०२३<br>ताबा नोटीस<br>दि.०५/०८/२०२४ | आंबी<br>आंबी<br>आंबी | १४१ | ५१ आर |
| ३. | कर्जदार– श्री. योगेश एकनाथ पवार<br>जामीनदार – श्री. जगन्नाथ माणिक बडधे<br>जामीनदार – श्री. पांडुरंग भाऊ मेटे | दावा रक्कम रु.<br>४२६२८०/–<br>दि.०१/१०/२०२२<br>पासून १५% व्याज+<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२०/०३/२०२३<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०८/२०२३<br>ताबा नोटीस<br>दि.०५/०८/२०२४ | नर्सरी<br>नर्सरी<br>टाकळीमिया | ६६०/३ | ०१ आर |
| ४. | कर्जदार – श्री. जालींदर रामचंद्र मोढे<br>जामीनदार – श्री. विक्रम जालींदर मोढे<br>जामीनदार – श्री. पद्माकर दत्तात्रय गोसावी | दावा रक्कम रु.<br>९४१०००/–<br>दि.०१/१०/२०२२<br>पासून १५% व्याज+<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२०/०३/२०२३<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०८/२०२३<br>ताबा नोटीस<br>दि.०५/०८/२०२४ | टाकळीमिया<br>टाकळीमिया<br>टाकळीमिया | ५८/१ | ०१ हेक्टर<br>५६ आर |
| ५. | कर्जदार – श्री. भगवान वसंत ठोंबरे<br>जामीनदार – श्री. राजेंद्र रावसाहेब साबळे<br>जामीनदार – श्री. बाबासाहेब सिताराम सरोदे | दावा रक्कम रु.<br>१२११०००/–<br>दि.०१/१०/२०२२<br>पासून १५% व्याज+<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०४/२०२३<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०८/२०२३<br>ताबा नोटीस<br>दि.०५/०८/२०२४ | तांभेरे<br>रामपूर<br>तांदूळनेर | ९२/३/१ | ८० आर |
| ६. | कर्जदार–अश्विनी दादासाहेव लांडगे<br>जामीनदार श्री. शिवाजी गोवर्धन मोकळे<br>जामीनदार श्री. दादासाहेब बबन लांडगे<br>जामीनदा – श्री. मच्छिंद्र खंडु विधाटे | दावा रक्कम रु.<br>८२३९१३/–<br>दि.०१/०९/२०२३<br>पासून १६% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२३/०४/२०२४<br>जप्ती नोटीस<br>दि.१९/०७/२०२४<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | टाकळीमिया<br>टाकळीमिया<br>टाकळीमिया<br>टाकळीमिया | ४८७/२ | ८८ आर |
| ७. | कर्जदार – श्री. भागवत तुकाराम सोळुंके<br>जामीनदार – श्री. ज्ञानेश्वर विठ्ठल सोळुंके | दावा रक्कम रु.<br>५५६३८२/–<br>दि.०१/०९/२०२३<br>पासून १४% व्याज+<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०६/२०२४<br>जप्ती नोटीस<br>दि.३१/०७/२०२४<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | माहेगाव<br>(महालगाव)<br>माहेगाव | ४२/२ | ०.८० आर |
| ८. | कर्जदार – श्री. भरत अंबादास आढाव<br>जामीनदार श्री. रामचंद्र अंबादास आढाव<br>जानिवार श्री. अशोक पोपट दांगट | दावा रक्कम रु.<br>४७०८६२/–<br>दि.०१/०९/२०२३<br>पासून १५% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०६/२०२४<br>जप्ती नोटीस<br>दि.३१/०७/२०२४<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | माहेगाव<br>माहेगाव<br>माहेगाव | १०२/२ | ०.८० आर |

## मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. टाकळीमिया

| अ.नं. | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट नं. भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर. चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | कर्जदार श्री. पांडूरंग साहेबराव जाधव<br>जामिनदार श्री. गोविंद भाऊसाहेब जाधव<br>जामिनदार – श्री. सुरेश पंढरीनाथ पवार | दावा रक्कम रु.<br>२३९२७५/–<br>दि.०१/०९/२०२३<br>पासून १३% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०६/२०२४<br>जप्ती नोटीस<br>दि.३१/०७/२०२४<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | माहेगाव<br>(दरडगाव<br>तर्फे बेलापूर)<br>माहेगाव<br>माहेगाव | ९२/१ | २० आर |
| १०. | कर्जदार – श्री. गोविंद अनंत कोळसे<br>जामीनदार – श्री. बाबासाहेब अशोक हारदे<br>जामीनदार – श्री. बाळासाहेब भास्कर कोळसे | दावा रक्कम रु.<br>२६९७७०/–<br>दि.०१/०९/२०२३<br>पासून १६% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२३/०४/२०२४<br>जप्ती नोटीस<br>दि.१९/०७/२०२४<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | त्रिंबकपूर<br>टाकळीमिया<br>त्रिंबकपूर | ११५/२ | २१ आर |
| ११. | कर्जदार–श्री. धर्माजी रखमाजी चव्हाण<br>जामीनदार – श्री. अमोल काशिनाथ निशाणे<br>जामीनदार–श्री. श्रीधर जगन्नाथ पवार | दावा रक्कम रु.<br>७०२६६८/–<br>दि.०१/०९/२०२३<br>पासून १४% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०६/२०२४<br>जप्ती नोटीस<br>दि.३१/०७/२०२४<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | माहेगाव<br>खुडसरगाव<br>खुडसरगाव | १५/२ | ८२ आर |
| १२. | कर्जदार–श्री. रविशेखर बापुसाहेब आनंदे<br>जामीनदार–श्री दत्तात्रय काशिनाथ आढाव<br>जामीनदार–श्री. सागर संजय बोरुडे | दावा रक्कम रु.<br>४१२७५०/–<br>दि.०१/०६/२०१९<br>पासून १५% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०३/०१/२०२०<br>जप्ती नोटीस<br>दि.०२/०९/२०२०<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | लाख<br>लाख<br>लाख | ८४/१ | ०१ हे. |
| १३. | कर्जदार–श्री. संजय एकनाथ घोलप<br>जामीनदार–श्री. मच्छिंद्र रखमाजी जाधव<br>जामीनदार–श्री. बाळासाहेब लक्ष्मण मोटे | दावा रक्कम रु.<br>४५३०००/–<br>दि.०१/१०/२०१९<br>पासून १५% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०३/०१/२०२०<br>जप्ती नोटीस<br>दि.०२/०९/२०२०<br>ताबा नोटीस<br>दि.२८/०२/२०२५ | पाथरे खु.<br>देवळाली<br>प्रवरा<br>राहाता | ----<br>१३७४/२<br>(जामिनदार<br>याची) | ---<br>०.२० आर |
| १४. | कर्जदार–श्री. आप्पासाहेब वसंत बोरुडे<br>जामीनदार श्री. हरीभाऊ दामोधर मुंगसे<br>जामीनदार श्री. तान्हाजी मारुती जंगले | दावा रक्कम रु.<br>१४६७००/–<br>दि.०१/१६/२०१७<br>पासून १८% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२६/१२/२०२७<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०२/२०१८<br>ताबा नोटीस<br>दि.१२/०२/२०१९ | मालुंजे खु.<br>महालगाव<br>माहेगाव<br>पानेगाव | ६८/१/ब/२ | ०.५८ आर |
| १५. | कर्जदार श्री. संभाजी धर्मा पवार<br>जामीनदार –श्री. भाऊसाहेब भास्कर गुरसळ<br>जामीनदार श्री. बाळासाहेब धर्मा पवार | दावा रक्कम रु.<br>५९९३८०/–<br>दि.०१/०६/२०१७<br>पासून १८% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.२६/१२/२०२७<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०२/२०१८<br>ताबा नोटीस<br>दि.१२/०२/२०१९ | खुडसरगाव<br>(माहेगाव)<br>खुडसरगाव<br>खुडसरगाव | ११७/१ | ०१ हे.<br>०.५७ आर |
| १६. | कर्जदार–श्री. विकास अरुण करपे<br>जामीनदार–श्री. अरुण भिकाजी करपे<br>जामीनदार–श्री. गोरक्षनाथ शंकर तुपे | दावा रक्कम रु.<br>१४६३०००/–<br>दि.०१/१०/२०२१<br>पासून १५% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.३१/०५/२०२२<br>जप्ती नोटीस<br>दि.२१/०७/२०२२<br>ताबा नोटीस<br>दि.३१/१०/२०२३ | टाकळीमिया<br>टाकळीमिया<br>टाकळीमिया | ----<br>१५७<br>(जामिनदार<br>यांची) | ---<br>०.८९ आर |
| १७. | कर्जदार– श्री. राजेंद्र अशोक आढाव<br>जामीनदार–श्री. राहुल मोहन जाधव<br>जामीनदार–श्री. मधुकर रामदास जाधव | दावा रक्कम रु.<br>२०६२५०/–<br>दि.०१/१०/२०२१<br>पासून १५% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.३१/०५/२०२२<br>जप्ती नोटीस<br>दि.२१/०७/२०२२<br>ताबा नोटीस<br>दि.३१/१०/२०२३ | लाख<br>लाख<br>लाख | २/अ | ०.५२ आर |
| १८. | कर्जदार–श्री. दिपक नानासाहेब पठारे<br>जमीनदार–श्री. विजय पोपटराव पठारे<br>जामीनदार–श्री. श्रीधर बापुराव चव्हाण | दावा रक्कम रु.<br>४७६०००/–<br>दि.०१/१०/२०२१<br>पासून १५% व्याज +<br>इतर खर्च | थकबाकी मागणी नोटीस<br>दि.०४/०४/२०२३<br>जप्ती नोटीस<br>दि.२३/०८/२०२३<br>ताबा नोटीस<br>दि.२०/११/२०२४ | देवळाली<br>प्रवरा<br>देवळाली<br>प्रवरा<br>देवळाली<br>प्रवरा | १८४४/१/२<br>१८४४/२ | ०.१५ आर<br>०१ हेक्टर<br>४४ आर |

(टिप:– चतु: सिमा– पूर्व, पश्चिम, दक्षिण. उत्तर मुळ नकाशाप्रमाणे)

(अे. आर. वाबळे)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या., टाकळीमिया

दिनांक : १६/०५/२०२३
स्थळ : टाकळीमिया

FinOlex PIPES
घर बांधताय...!
नगर जिल्ह्यात सर्वात कमी दरात फिनोलेक्स मटेरियल!
तर मग चला, प्लंबिंग पी.व्हि.सी सॅनिटरी आणि टाईल्स करिता...
सुनिल सेल्स कॉर्पोरेशन
वरशिंदे नांदूर रोड, राहुरी, जि. अ.नगर
प्रोप्रा. सुनिल मखड ९८२२ ४२८६९९ | विजय म्हडड ९८९०४३३४५०



आता लाडक्या बाळाच्या वाढदिवसाची जाहिरात

सायं. दैनिक सार्वमंथन
फ्री... फ्री... फ्री...
- अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा -
9822544072
9370948911
* नियम व अटी लागू

## मंथन फटकारे

अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे
मो. ९५०३९५९९५७

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला आचारसंहितेचा अडसर-वृत्त

**- मनापासून कर्जमाफी द्यायची असते तर इतक्या दिवसात दिली असती? बहुतेक आचारसंहितेची वाट पहात असावेत?**

ओबीसी समाजाचा विकास हाच राज्याच्या प्रगतीचा पाया-मुख्यमंत्री

**- ओबीसी बांधवानी सावध व्हावे!''देवा''च्या मनात तुम्ही आलात?वेळीच जागे व्हा.. अन्यथा....?**

पाकला इतिहासजमा करु-पाक लष्करप्रमुख

**- एकदा भारताचा इतिहास वाचून बघा,म्हणजे अशी स्वप्ने पडणार नाहीत!आमचा इतिहास जरी वाचला तरी पाकिस्तानचे काय होईल?असा विचार मनात येईल?**

खुल्या प्रवर्गातून मागास विद्यार्थ्यांना संधी नाकारणे हे घटना विरोधी-वृत्त

**- हि तर सुरुवात आहे? आरक्षण डोळ्यात खुपतंय? हळू-हळू चाचपणी सुरु केलीय!**

रिपाईचे ऐक्य होणार असेल तर मी मंत्रिपदाचा राजीनामा देईल-आठवले

**- एवढ्या कष्टाने?मिळविलेल्या मंत्रिपदावर लाथ?साहेब, सर्वांनाच माहित आहे, तुम्ही सर्व करताल पण मंत्रिपद.....? कसं शक्य आहे?**

महिला कंडक्टरला मुजोर प्रवाशाची मारहाण-वृत्त

**- एस.टी.महामंडळ यावर काही कारवाई?महिला कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी घेणार ना?**

# आई-बाबांच्या सहजीवनाला सलाम!

## प्राजक्त तनपुरेंची पोस्ट चर्चेत; लग्नाच्या वाढदिवसानिमित्त तनपुरेंचा हृदयस्पर्शी संदेश

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून विविध कारणांनी चर्चेत असलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे पुन्हा एकदा भावनिक पोस्टमुळे चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. सोशल मीडियावर त्यांनी आपल्या आई-वडिलांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त केलेली पोस्ट सध्या समर्थकांसह राजकीय वर्तुळातही मोठ्या प्रमाणावर चर्चिली जात आहे.

ज्येष्ठ नेते माजी खासदार प्रसाद तनपुरे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. उषाताई तनपुरे यांच्या सहजीवनाच्या वाढदिवसानिमित्त प्राजक्त तनपुरेंनी आपल्या भावना व्यक्त करत एक हृदयस्पर्शी संदेश शेअर केला आहे. विशेष म्हणजे, डॉ. उषाताई तनपुरे या सहकार नेते राजारामबापू पाटील यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांच्या भगिनी आहेत.

या पोस्टमध्ये तनपुरे यांनी नातं किती मोठं असतं हे शब्दांनी नाही, तर आयुष्यभर एकमेकांना दिलेल्या साथीतून कळतं, असे म्हणत आपल्या आई-वडिलांच्या सहजीवनाचे कौतुक केले आहे. तसेच, लहानपणापासून मिळालेले संस्कार, संकटात खंबीरपणे उभं राहण्याची ताकद आणि समाजासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा हीच आपली खरी संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

तुमचा मुलगा म्हणून मिळालेली ओळख हीच माझ्यासाठी सर्वात मोठी गोष्ट आहे, असे सांगत त्यांनी आपल्या आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शेवटी त्यांनी त्यांच्या निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली आहे.

प्राजक्त तनपुरेंची ही भावनिक पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, अनेकांनी या संदेशाला पसंती देत तनपुरे कुटुंबीयांवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# राहुरीत अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

## टेम्पोसह वाळू जप्त; ३.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी | प्रतिनिधी**

राहुरी शहरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत तब्बल ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार भगवान थोरात, रमीजराजा आत्तार, प्रकाश मांडगे, विशाल तनपुरे व चालक उत्तरेश्वर मोराळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दिनांक १७ मे २०२६ रोजी रात्री पेट्रोलिंगदरम्यान पथकाला गुप्त बातमीदारामार्फत राहुरी शहरातील १८ एकर परिसरात टेम्पोमधून अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पथकाने सापळा रचून टेम्पो अडवला व चालकाला ताब्यात घेतले.

तपासात चालकाचे नाव अकील कासम पठाण (वय २८, रा.देसवंडी, ता. राहुरी) असे समोर आले. तसेच टेम्पोचा मालक ओमकार संजय तनपुरे (रा. तनपुरवाडी, ता. राहुरी) असल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईत आरोपीकडून सुमारे २० हजार रुपये किमतीची २ ब्रास वाळू आणि ३ लाख रुपये किमतीचा टाटा ४०७ टेम्पो असा एकूण ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात



आला.

याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करत आहेत.

दरम्यान, जिल्ह्यात कुठेही अवैध धंदे सुरू असल्यास स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर (फोन: ०२४१-२४१६१११) किंवा डायल ११२ वर माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा स्थगित

सार्व मंथन ✍ अहिल्यानगर | जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने दि. २० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा (ऑटोमोबाईल सेक्टर) महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे स्थगित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी नोंदणी केलेले उमेदवार, प्रशिक्षण संस्था, महाविद्यालये तसेच संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे.

# रेशनिंग गव्हाचा काळाबाजार उजेडात?

## आर्थिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; दोन ट्रकसह ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त; 'आशीर्वाद' कोणाचा?

**दिव्य सार्वमंथन**
**अ.नगर | प्रतिनिधी**

शहरात रेशनिंगच्या गव्हाचा काळाबाजार सुरू असल्याचा संशय अधिक गडद करणारी मोठी कारवाई आर्थिक गुन्हे शाखेने केली आहे. उदयन राजे हॉटेलजवळील पार्किंग परिसरात टाकलेल्या धाडीत दोन मालवाहू ट्रक पकडण्यात आले असून, त्यातून तब्बल ३९ हजार किलोहून अधिक गहू जप्त करण्यात आला. या कारवाईत गव्हासह दोन्ही ट्रक मिळून सुमारे ४२ लाख ७८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना गव्हाचा मोठा साठा काळ्या बाजारात विक्रीसाठी हलवला जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेला तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख यांच्या पथकाने सापळा रचत संशयित वाहनांवर नजर ठेवली.

कारवाईदरम्यान एमएच ०६ एसी ०१०८ आणि एमपी ४६ झेडई ५२५१ हे दोन ट्रक ताब्यात घेण्यात आले. तपासणीत दोन्ही वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात गव्हाच्या गोण्या आढळून आल्या. पहिल्या ट्रकमध्ये १८ हजार ८९५ किलो गहू असून त्याची किंमत ३ लाख ७७ हजार ९०० रुपये असल्याचे निष्पन्न झाले. तर दुसऱ्या ट्रकमध्ये २० हजार ६४० किलो गहू आढळून आला असून त्याची किंमत ४ लाख १२ हजार ८०० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

चालकांकडून मिळालेल्या माहितीतही विसंगती आढळून आल्याने पोलिसांचा संशय अधिकच बळावला आहे. एका चालकाने गहू केकसी येथून भरून सणसवाडीला नेत असल्याचे सांगितले, मात्र नंतर माल अहिल्यानगरमधील 'अंकित' नावाच्या व्यक्तीकडे पोहोचवायचा असल्याचे कबूल केल्याचे समजते. दुसऱ्या चालकाने हा माल मार्केटयार्डातून साताऱ्यातील फ्लोअर मिलसाठी नेला जात असल्याचा दावा केला.

दरम्यान, जप्त करण्यात आलेला गहू रेशनिंगचा आहे का, याबाबत खात्री करण्यासाठी पुरवठा विभागाकडे नमुने आणि माहिती पाठवण्यात आली आहे. चौकशी अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

मात्र, या प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिस दलातीलच एका कर्मचाऱ्याच्या 'आशीर्वादाने' रेशनिंगचा गहू काळ्या बाजारात विकला जात असल्याची जोरदार चर्चा सुरू असून, हे रॅकेट नेमके कोणाच्या संरक्षणाखाली सुरू होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे अधीक्षक मुम्मका सुदर्शन या चर्चेची गंभीर दखल घेणार का,? याची उत्सुकता वाढली आहे.

# अनैतिक संबंधातून महिलेचा केला खून

## आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

**दिव्य सार्वमंथन**
**शिर्डी | प्रतिनिधी**

अनैतिक संबंधातून निर्माण झालेल्या वादाचे भीषण रूप घेत एका विवाहित महिलेचा निर्घृण खून करणाऱ्या आरोपीस राहाता येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावत कठोर संदेश दिला आहे. आरोपी अजय राजेंद्र म्हस्के (वय २८, रा. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) यास न्यायालयाने दोषी ठरवत जन्मठेपेसह १० हजार रुपयांचा दंड ठोठावला.

ही धक्कादायक घटना १६ जुलै २०२३ रोजी राहाता तालुक्यात घडली होती. सविता सुनील बोरसे (वय २५, मूळ रा. एकलहरे, जि. नाशिक, सध्या भोपळे वस्ती, रुई ता. राहाता) हिच्यासोबत आरोपीचे अनैतिक संबंध होते. मागील तीन वर्षांपासून दोघे एकत्र राहत होते.

दरम्यान आरोपी अजय म्हस्के हा दुसरे लग्न करण्याच्या तयारीत असल्याने दोघांमध्ये वारंवार वाद होत होते. याबाबत सविता हिने आरोपीच्या कुटुंबीयांकडे तसेच तिच्या माहेरच्यांकडे तक्रारी केल्या होत्या. एवढेच नव्हे तर राहाता पोलीस ठाण्यातही तिने त्रासाबाबत तक्रार नोंदवली होती.

या सर्व गोष्टींचा राग मनात धरून आरोपीने सविता हिच्यावर धारदार चाकूने गळ्यावर वार करत तिचा निर्घृण खून केला. याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६१५/२०२३, भारतीय दंड विधान कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीस अटक केली होती.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक नंदकुमार दुधाळ, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाठ, सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी पाटील, पोहेकॉ. संदीप गडाख व पोकॉ कैलास राठोड यांनी केला. तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध राहाता न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

# शेतमजुरांनीच चोरला मुद्देमाल

दिव्य सार्व मंथन ✍ पाथर्डी | तालुक्यातील मिरी येथील एका फार्म हाऊसमधून शेतमजुरांनीच तब्बल ३ लाख ६१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल चोरी करून फरार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अजीतकुमार प्रल्हाद जाधवर (वय ४७, रा. गुलाबनगर, सावेडी, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते शेती व जमीन खरेदी-विक्री व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचे दाजी संजय दत्तात्रय पालवे यांच्या मिरी येथील गट नं. ११२ व १०४ मधील शेतजमीन ते वाट्याने करत असून त्या ठिकाणी फार्महाऊस आहे.शेतीच्या कामासाठी मध्यप्रदेश राज्यातील सेंधवा जिल्ह्यातील तेदुवा येथील रमेश मोरे व त्याची पत्नी यांना सुमारे तीन वर्षांपासून मजुरीसाठी ठेवण्यात आले होते. ते कुटुंबासह फार्महाऊसमध्ये वास्तव्यास होते.

# भाच्याच्या मारहाणीचा जाब विचारला

## तरुणावर हल्ला, कारवर दगडफेक करत नुकसान

**दिव्य सार्वमंथन**
**राहुरी खुर्द | प्रतिनिधी**

भाच्याला मारहाण केल्याचा जाब विचारण्याची 'चूक' एका तरुणाला चांगलीच महागात पडली. आरोपींनी संतापाच्या भरात संबंधितावर दगडाने हल्ला करत शिवीगाळ केलीच, शिवाय त्याच्या चारचाकी वाहनावरही दगडफेक करून मोठे नुकसान केल्याची धक्कादायक घटना राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथे घडली.

याबाबत मनोज केशव मकासरे (वय ३३, रा. कुक्कडवेढे, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, त्यांच्या भाचा आयुष गायकवाड यास तेजस जाधव याने किरकोळ कारणावरून यापूर्वीच मारहाण केली होती.

दरम्यान, दि. १३ मे २०२६ रोजी मनोज मकासरे हे कुटुंबासह लग्न समारंभ आटोपून सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास चारचाकी वाहनातून राहुरीहून कुक्कडवेढेकडे जात असताना नगर-मनमाड रोडवरील राहुरी खुर्द येथील एका हॉटेलसमोर तेजस जाधव दिसला.

यावेळी मकासरे यांनी गाडी थांबवून माझ्या भाच्याला का मारहाण केली? असा जाब विचारताच आरोपींचा संताप अनावर झाला. त्यांनी शिवीगाळ करत दगडाने मकासरे यांच्यावर हल्ला केला. तसेच त्यांच्या वाहनावर दगडफेक करून नुकसान केले.

या प्रकरणी मनोज मकासरे यांच्या फिर्यादीवरून तेजस जाधव (रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर), अनिल गायकवाड व त्याचा मुलगा (नाव अज्ञात, रा. देहरे, ता. नगर) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# नगरसह पुण्याच्या ग्रामिण भागात दरोडेखोरांची दहशत

## १२ गंभीर गुन्ह्यांनंतर पोलिसांचा मोठा निर्णय; संघटित कोंग्या काळे टोळीवर मोक्का कारवाई

**दिव्य सार्वमंथन**
**अ.नगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर व पुणे ग्रामीण जिल्ह्यात दरोडे, घरफोडी आणि जबरी चोरीसारख्या गंभीर गुन्ह्यांद्वारे दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर अखेर मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक अधिनियम) अंतर्गत कडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे गुन्हेगारी विश्वात खळबळ उडाली आहे.

पारनेर तालुक्यातील करंदी येथील वस्तीवर दरोडा टाकून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटणाऱ्या टोळीचा प्रमुख विशाल उर्फ कोंग्या नरेश काळे (रा. माजमपुर, ता. पारनेर) याच्यासह पंकज नरेश काळे (रा. निघोज), प्रविण नरेश काळे, सचिन नरेश काळे, गिरीष आलम काळे (सर्व रा. पारनेर परिसर) व संदीप उर्फ गोट्या विठ्ठल मैड (रा. जवळा, ता. पारनेर) या सहा जणांचा समावेश आहे.

या टोळीने अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तसेच पुणे ग्रामीण जिल्ह्यातील शिरूर, आळेफाटा व मंचर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संघटितपणे घातक शस्त्रांचा वापर करून जबरी चोरी, दरोडे, घरफोडी, मारहाण व दमदाटी असे एकूण १२ गंभीर गुन्हे केले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या आरोपींविरुद्ध पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची बारकाईने छाननी करून तो विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांच्याकडे पाठविण्यात आला.

सदर प्रस्तावास मंजुरी देत विशेष पोलीस महानिरीक्षकांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक अधिनियम १९९९ अंतर्गत कलम ३(१)(ळळ), ३(२), ३(४) ही वाढीव कलमे लावण्यास मान्यता दिली आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने (नगर ग्रामीण विभाग) हे करत आहेत.

दरम्यान, भविष्यातही अहिल्यानगर जिल्ह्यात मालमत्ता व व्यक्तीविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

दैनिक दिव्य सार्वमंथन
नवी दिशा, नवी आशा

**दैनिक दिव्य सार्वमंथन** हे वृत्तपत्र मालक **प्रकाशक सौ. सपना अनिल कोळसे** यांनी मुद्रक **श्री अनिल गंगाधर कोळसे** यांच्या **स्वराज प्रेस आणि प्रिंटिंग, गट नं. ५९३, कोळसे निवास, कोळसे दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र - ४१३७०५** येथे छापून सर्वे. नं ५९३, दुबिचा मळा, व्यंकोबा मंदिर परिसर, ता. राहुरी, अहिल्यानगर, महाराष्ट्र ४१३७०५ येथे प्रकाशित केला. संपादक - **श्री अनिल गंगाधर कोळसे,** (सर्व न्यायालयीन वादविवाद राहुरी न्याय कक्षे अंतर्गत)
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
**The Daily Divya Sarvmanthan** Is Published By The Owner And Publisher, Sapna Anil Kolse, printed It At, printer Anil Gangadhar Kolses, Swaraj Press And Printing. S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705 And Published At S. No. 593, Dubicha Mala, Vynkoba Mandir Area, Rahuri, Ahilyanagar, Maharashtra - 413705. *editor-anil Gangadhar Kolse, **e-Mail-Sarvmanthan16@gmail.com, MHMAR/26/A3154**